**<u>ठळक बातम्या</u>**

- सर्वप्रकारच्या पात्र संस्थांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ दिला जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- घरगुती एलपीजी सिलिंडर साठ रुपयांनी तर व्यावसायिक सिलिंडर ११५ रुपयांनी महाग, देशात इंधन तुटवटा नसल्याचं पेट्रोलियम कंपन्यांचं स्पष्टीकरण

- अधिकाधिक भारतीय कंपन्यांना फिनलंडमध्ये गुंतवणुकीचं फिनलंडच्या अध्यक्षांचं आवाहन

- अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा विषय संसदेत मांडण्यासाठी रोहित पवार यांच्या दिल्लीत गाठीभेटी

**आणि**

- राज्यभरात विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचं आयोजन

**<><><><><>**

राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना, कर्ज देण्यासाठी पात्र अशा कोणत्याही संस्थेकडून घेतलेल्या कर्जासाठी लागू राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. नागपूरमधे ते वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकित राहिलेली २ लाख रुपये पर्यंतची कर्ज माफ करण्याच्या दृष्टीनं काल अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. त्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. ही कर्जमाफी बँकेला नसून शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा याकरता अंमलबजावणीची कार्यपद्धती तयार करण्यात येत आहे, असं ते म्हणाले

....... **होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

**<><><><><>**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपयांनी वाढ झाली आहे. दर वाढीनंतर आता एका सिलेंडरची किंमत दिल्लीमध्ये ९१३ रुपये, मुंबईत ९१२ रुपये ५० पैसे, कोलकत्ता इथं ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे इतकी झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत देखील ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

**<><><><><>**

होर्मूझच्या सामुद्रधुनीतली जलवाहतूक बंद झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यात खंड पडल्याच्या समाज माध्यमांवर प्रसृत झालेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असून भारताकडे पुरेसे इंधन साठे आणि पर्यायी पुरवठा स्त्रोत आहेत असं हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीनं स्पष्ट केलं आहे. इंधन पुरवठ्यामधला व्यत्यय किंवा तुटवडा या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असून नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये तसंच पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असं कंपनीनं ट्विट करून सांगितलं आहे.

**<><><><><>**

अधिकाधिक भारतीय कंपन्यांनी फिनलंडमध्ये गुंतवणूक करावी असं आवाहन फिनलंडचे अध्यक्ष डॉ. अलेक्झांडर स्टुब यांनी आज केलं. मुंबईत दोन्ही देशातल्या उद्योजकांना ते संबोधित करत होते. अमेरिकेच्या अस्थिर व्यापार धोरणामुळं जगात इतरत्र व्यापार करार होत आहेत. इतर देशात गुंतवणूक होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. गेल्या काही वर्षात देशातल्या पायाभूत सुविधा, रस्त्यांची परिस्थिती सुधारल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

सध्या सुरू असलेलं इराण, इस्त्राइल आणि अमेरिका युद्ध कधी संपेल याचा अंदाज व्यक्त करायला त्यांनी नकार दिला. याच्या तुलनेत रशिया - युक्रेन युद्धाचा

अधिक फटका युरोपियन देशांना बसला असल्यानं ते लवकर संपावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सकाळी त्यांनी मुंबई विद्यापीठात विद्यार्थी आणि इतर मान्यवरांना संबोधित केलं. राज्य सरकारनं फिनलंडच्या ३ कंपन्यांसोबत ससून बंदराच्या नुतनीकरणासाठी आज करार केला. घनकचरा व्यवस्था, प्लॅस्टिकचा तसंच टाकून दिलेल्या मासेमारीच्या जाळ्यांचा पुर्नवापर या क्षेत्रात फिनलंडच्या कंपन्या काम करणार आहेत.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे देशातल्या युवकांच्या नोकऱ्या जाणार हा केवळ एक भ्रम असून भारतानं तो मोडीत काढला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी आज पुण्यात व्यक्त केलं . पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटचा १५ वा पदवीदान समारंभ आज पुण्यात केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला त्यावेळी ते बोलत होते. विविध विभागात प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी सेठ यांच्या हस्ते करण्यात आला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची नवी दिल्लीत भेट घेतली. अजित पवार यांच्या विमान अपघातातल्या मृत्यूच्या चौकशीमध्ये मदत करण्याची मागणी केजरीवाल यांच्याकडे केली आहे. हा विषय संसदेत मांडण्यात मदत करण्याचं आश्वासन केजरीवाल यांनी दिल्याचं रोहित पवार यांनी प्रसार माध्यमांना सांगितलं.

रोहित पवार यांनी राजदचे खासदार मनोज कुमार झा यांचीही भेट घेऊन त्यांनाही या अपघाताविषयी माहिती देऊन राज्यसभेत हा विषय मांडण्याची विनंती केली.

<><><><><>

लातूर जिल्ह्यात कार आणि टेम्पोच्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला आणि दोघे गंभीर जखमी झाले. औसा–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर औसा शहराजवळ काल रात्री हा अपघात झाला.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या मुंब्रा मध्ये आज सकाळी दोन गुंडांनी एका व्यक्तीवर गोळीबार के◌ेला.  पोलिसांनी यातील एका व्यक्तीला अटक केली आहे. आज सकाळी पाच वाजता मुंब्रा कौसा मध्ये ही घटना घडली.

<><><><><>

मुंबईतल्या कांदिवली भागात बेकायदेशीर फेरीवाल्यांवर कारवाई करणाऱ्या पालिकेच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला केल्याप्रकरणी पाच जणांना आज पोलिसांनी ताब्यात घेतलं. अतिक्रमण विरोधी मोहिमेमध्ये सहभागी अधिकाऱ्यांसह मातीउपसा यंत्राच्या चालकाला देखील पाठलाग करून मारहाण केल्याचा या पाच जणांवर आरोप  आहे. भारतीय न्याय संहिते अंतर्गत समता नगर पोलीस ठाण्यात या पाचही जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

राज्यभरात आज ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान’ राबवण्यात आलं. विविध ठिकाणी या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांनी विविध दाखले काढले.

शासनाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधांचा वापर करायला नागरिकांनी शिकलं पाहिजे. यामधूनच गावं आणि शहरं उभी राहतात. म्हणूनच हे अभियान सुरू केलं आहे,' असं प्रतिपादन रत्नागिरीचे पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज केलं. **रत्नागिरी** जिल्ह्यात पाली इथं सामंत यांच्या हस्ते या अभियानाचा प्रारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या विविध तहसील कार्यालयांमार्फत या अभियानाचा पहिला टप्पा राबवायला सुरुवात झाली आहे. कुडाळ तालुक्यात नेरूर मध्ये जिल्हाधिकारी यांनी याचा शुभारंभ केला तर कणकवली मध्ये पालकमंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत हे अभियान राबवण्यात आलं. शासनाच्या १५ महत्त्वाच्या सुविधा थेट जनतेपर्यंत पोहोचवणं , जनजागृती करणं आणि जनतेची प्रशासकीय कामं वेगानं करणं हे या अभियानाचं मुख्य उद्दिष्ट असून त्याचा नागरिकांनी लाभ घ्याव्या, असं आवाहन राणे यांनी यावेळी केलं.

**चंद्रपूर** जिल्ह्यात महसूल विभागातर्फे हा कार्यक्रम राबवण्यात आला असून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत या अभियानाचा प्रारंभ झाला.

**गडचिरोली** जिल्ह्यामधल्या विविध तालुक्यांमध्ये महसूल मंडळ स्तरावर समाधान शिबीर अभियान आज आयोजित करण्यात आलं होतं. शेकडो नागरिकांनी या शिबिरांमधून उपलब्ध करुन दिलेल्या महसूलविषयक विविध सेवांचा लाभ घेतला, अशी माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

**लातूर** जिल्ह्यातल्या अहमदपूर तालुक्यातल्या किनगाव इथं आयोजित समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचं उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

जागतिक महिला दिनाचं औचित्य साधून सार्वजनिक आरोग्य विभागा कडून गर्भाशयमुख कर्करोग प्रतिबंधासाठी १४ ते १५ वर्षा दरम्यानच्या मुलींसाठी ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेची सुरुवात होणार आहे. तसंच आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे. राज्यातील एकूण९ लाख ८४ हजार 414 मुलींना या मोहिमेचा लाभ मिळणार असून लसीकरण पूर्णपणे मोफत आणि पालकांच्या संमतीने ऐच्छिक स्वरूपात होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, महानगरपालिका रुग्णालये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लसीकरण केले जाईल. सर्व लाभार्थ्यांची नोंदणी आणि प्रमाणपत्र वितरण केंद्र शासनाच्या U-WIN या डिजिटल पोर्टलद्वारे करण्यात येणार आहे. भारतामध्ये महिलांमधील कर्करोगांमध्ये गर्भाशयमुखाचा कर्करोग दुसऱ्या क्रमांकावर असून दरवर्षी सुमारे 80 हजार नवीन रुग्ण आढळतात आणि 42 हजारांहून अधिक मृत्यू होतात. एचपीव्ही प्रकार 16 व 18 पासून संरक्षण देणारी ही लस अत्यंत प्रभावी मानली जाते. ही मोहीम सलग तीन महिने विशेष अभियान म्हणून राबविण्यात येणार असून त्यानंतर ती नियमित लसीकरण कार्यक्रमाचा भाग होईल.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात उद्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. आतापर्यंत कोणत्याही संघाने सलग दोनदा विजेतेपद जिंकलेलं नाही. यावेळी भारताकडे इतिहास रचण्याची सुवर्णसंधी आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला असून उद्याचा अंतिम सामना जिंकला, तर टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सलग दोन ट्रॉफी जिंकणारा तो पहिला संघ बनणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात टी-२० क्रिकेटमध्ये झालेल्या सामन्यांत भारताचा

वरचष्मा राहिला आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण ३० सामने खेळले गेले आहेत, ज्यात भारताने १८ तर न्यूझीलंडने ११ सामने जिंकले आहेत. एक सामना बरोबरीत सुटला होता.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यातलं हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी दमट हवामान राहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहिलं. राज्यात सर्वाधिक तापमान अमरावती इथं ४० पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं.

**//<><><><><>//**